आदिवासी उपयोजना क्षेत्रातील/आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना सन २०१७-१८ मध्ये राबविण्यासाठी प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः आऊयो -२४१७/प्र.क्र.२२८/४ अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: २१ सप्टेंबर, २०१७

वाचा

१) **शासन निर्णय क्र. आऊयो-२४१६/प्र.क्र.१७७/४-अे, दि. ९ ऑगस्ट, २०१७**
२) **वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७**
३) **वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३,दि. ३० जून,२०१७**

प्रस्तावना :-

आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत/क्षेत्राबाहेरील) राज्यामध्ये सन १९९२-९३ पासून राबविण्यात येत होती. सदर योजना दिर्घ कालावधीपासून राबविण्यात येत असल्याने योजनेचे पूनर्विलोकन करण्याचा निर्णय विभागाने घेतला. त्यासाठी विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी व प्राप्त परिस्थितीत शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करण्यासाठी आवश्यक बाबी विचारात घेऊन संदर्भाधीन अ.क्र. १ येथील दि.९ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये आदिवासी उपयोजना सुधारित करण्यात आली आहे.

सदर योजना सन २०१७-१८ या वर्षात राबविण्यासाठी आदिवासी विकास विभागाने क्षेत्रांतर्गत कार्यक्रमासाठी रु. ६६२४.८१ लक्ष व क्षेत्राबाहेरील कार्यक्रमासाठी रु. २१४१.६४ लक्ष असा एकूण रु.८७६६.४५ लक्ष एवढा निधी जिल्हा स्तरावर उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

आदिवासी शेतकऱ्यांसाठी सन २०१७-१८ या वर्षात आदिवासी उपयोजना राबविण्यासाठी, क्षेत्रांतर्गत उपयोजनेसाठी रु.६६२४.८१ लाख (रु.सहासष्ठ कोटी चोवीस लाख एक्याऐंशी हजार फक्त) व क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी रू. २१४१.६४ लाख (रू. एकवीस कोटी एकेचाळीस लाख चौसष्ठ हजार फक्त) याप्रमाणे एकूण रू. ८७६६.४५ लाख (रु. सत्याऐंशी कोटी सहासष्ठ लाख पंचेचाळीस हजार फक्त) एवढया निधीच्या कार्यक्रमास शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या अंमलबजावणीस वित्तीय मान्यता संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेकडून देण्यात येईल.

३. योजनेची अंमलबजावणी, आदिवासी विकास विभागाने जिल्हास्तरावर, सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय तरतूदीनुसार उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या मर्यादेतच करण्यात यावी.

४. सदर खर्च खालील लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

लेखाशीर्ष:-

१) **मागणी क्रमांक टी-५**

२४०१ पीक संवर्धन

पंचवार्षिक योजनेंतर्गत योजना

७९६ -जनजाती क्षेत्र उपयोजना

(०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना

राज्य योजनांतर्गत योजना

(०१)(०२) कृषि विकास विषयक विविध कार्यक्रम

(जिल्हास्तर योजना)

(२४०१ २१८४) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)

२) **मागणी क्रमांक टी-५**

२४०१ पीक संवर्धन

पंचवार्षिक योजनेंतर्गत योजना

७९६ -जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना

राज्य योजनांतर्गत योजना

(०२) (०२)शेतीकरिता मशागत सामग्रीचे वितरण/ क्षेत्रीय सुधारित अवजारे व उपकरणे

(जिल्हास्तर योजना)

(२४०१ १९६५) ३३ अर्थसहाय्य

४. सदर योजनेची अंमजबजावणी संदर्भाधीन अ.क्र. १ येथील दि. ९ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयातील नमूद घटकांसाठी त्यापुढील अनुदानाच्या मर्यादेत व सदर शासन निर्णयातील अटी, शर्ती व विहित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावी.

५. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२११७४२०६५५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2017.09.21 17:33:16 +05'30'

(सु.सं.धपाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त कृषि , महाराष्ट्र राज्य पुणे.
२. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रतीसह)
३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. सर्व विभागीय आयुक्त,
५. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
६. सर्व संचालक/सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
७. सर्व विभागीय कृषि सह संचालक
८. अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक/नागपूर/ठाणे/अमरावती,
९. सर्व आदिवासी विकास उपआयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन विकास मंडळ,
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व आदिवासी उप आयुक्त,
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१३. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, अकोला,
१६. सर्व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१७. महासंचालक माहिती व जनसंपर्क सचालनालय,मुंबई.
१८. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
१९. महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई /नागपूर
२०. सर्व सहसचिव/उपसचिव/अवरसचिव/कार्यासन अधिकारी, (कृषि) कृषि व पदुम विभाग
२१. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२
२२. वित्त विभाग व्यय १/अर्थसंकल्प १३, मंत्रालय, मुंबई -३२
२३. नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई - ३२,
२४. आदिवासी विकास विभाग,
२५. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव,
२६. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
२७. निवड नस्ती.

विवरणपत्र

शासन निर्णय क्र.आऊयो २४१७/प्र.क्र.२२८/४अे, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र

अ. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील:-

(रु.लाखात)

अ.क्र.	जिल्हा	रक्कम
१	पालघर	१५.००
२	लातूर	८.०१
३	उस्मानाबाद	३.००
४	नांदेड	१५२.९३
५	हिंगोली	१४५.००
६	परभणी	५.००
७	बीड	४.०१
८	जालना	५.०१
९	औरंगाबाद	१०.००
१०	गडचिरोली	७०.००
११	चंद्रपूर	२५०.००
१२	भंडारा	४०.००
१३	वर्धा	७३.१९
१४	नागपूर	१५०.६७
१५	यवतमाळ	१२९.७२
१६	अमरावती	७०.००
१७	वाशीम	७५.३२
१८	अकोला	८९.२१
१९	बुलढाणा	१०२.००
२०	सोलापूर	९.६८
२१	पूणे	९०.००
२२	अहमदनगर	५०.००
२३	जळगाव	१५०.००
२४	नंदूरबार	१०.००
२५	धूळे	१०३.८९
२६	नाशिक	१५०.००
२७	रायगड	८०.००
२८	ठाणे	१००.००
एकुण		२१४१.६४

आ. आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत:-

(रु.लाखात)

अ.क्र.	**जिल्हा**	**रक्कम**
१	पालघर	१५५०.००
२	नांदेड	१००.००
३	गडचिरोली	११७४.००
४	चंद्रपूर	४००.००
५	गोंदीया	१००.००
६	नागपूर	१०.००
७	यवतमाळ	३०५.९७
८	अमरावती	२७०.००
९	पूणे	२००.००
१०	अहमदनगर	८५.००
११	जळगाव	१५०.००
१२	नंदूरबार	८०२.६८
१३	धूळे	३३३.९६
१४	नाशिक	७००.००
१५	रायगड	४३.२०
१६	ठाणे	४००.००
एकूण		**६६२४.८१**